महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१८

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मुंबईतील म्हाडा संक्रमण शिबीरात १५ ते २० वर्षापासून राहणा-या नागरीकांना म्हाडाने घुसखोर म्हणून घोषित केल्याबाबत

(१) ९७१ (३०-११-०००२). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडा संकमण शिबीरात १५ ते २० वर्षापासून राहणा-या नागरीकांना म्हाडा आजपर्यंत भाडे वसूल करुनही त्यांना घुसखोर म्हणून घोषीत केले सदरहू नागरीकांकडे या ठिकाणचे सर्व पुरावे असून त्यांना घर खाली करण्यासाठी अधिकारी दबाव करीत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संकमण शिबीरात राहणा-या लोकांना त्यांचे रहिवाशी असल्याचे पुरावे तपासून त्यांना कायमस्वरुपी घर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. प्रकाश महेता (२४-१०-२०१८) : (१) हे खरे नाही,

मुंबईतील संक्रमण शिबीरांमध्ये अनधिकृतपणे वास्तव्य करणाऱ्या रहिवाशांकडून सेवाशुल्क वसूल केले जाते. तथापि, त्यामुळे त्यांना अधिकृत रहिवाशांचा दर्जा प्राप्त होत नाही. म्हाड अधिनियमातील तरतुदींनुसार अनधिकृतपणे वास्तव्य करणाऱ्या रहिवाशांविरुध्द घुसखोर म्हणून कार्यवाही करण्यात येते.

(२) व (३) संक्रमण शिबीरातील रहिवाशांचे तीन संवर्ग निर्माण करण्यात आलेले असून याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

बोरिवली (मुंबई) टाटा पावर हाऊस, जय महाराष्ट्र नगर येथील संक्रमण शिबिरातील रहिवाशांचे त्याच परिसरात पुनर्वसन करण्याबाबत

(२) २४२८ (३०-११-०००२). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील उपनगरातील बोरिवली येथील टाटा पावर हाऊस, जय महाराष्ट्र नगर या संक्रमण शिबिरात वर्षानुवर्षे अनेक कुटुंबे रहात असून त्यांच्या मुलांच्या शाळा, नोक-या याच ठिकाणी असल्यामुळे त्या रहिवाश्यांचे त्याच परिसरात पुनर्वसन करावे अशी मागणी तेथील रहिवाश्यांनी संबधित अधिका-यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे, व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. प्रकाश महेता (२४-१०-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) संक्रमण शिबीरातील गाळेधारकांच्या पुनर्वसनाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

मुंबई, ठाणे व नवी मुंबई या तीनही महानगरांच्या वाहतूकीवरील ताण वाढत असल्याबाबत

(३) २६८१३ (३०-११-०००२). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात मुंबईसह ठाणे, कल्याण, वाशी या प्रादेशिक परिवहन कार्यालयात नोंदविलेल्या वाहनांची संख्या सुमारे ५० लाखांपेक्षा जास्त असून सन २०१४-१५ या वर्षात ही संख्या ५४ लाखांच्या वर पोहचल्याने मुंबई, ठाणे व नवी मुंबई या तीनही महानगराच्या रस्त्यावरील वाहतूकीचा ताण प्रचंड प्रमाणात वाढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तीनही महानगरांच्या रस्त्यावरील वाहतूकीचा ताण कमी करण्यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना आखण्यात आल्या वा येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१८) : (१) होय.

(२) व (३) मुंबई, ठाणे व नवी मुंबई या तीनही महानगरांच्या रस्त्यावरील वाहतूकीचा ताण कमी करण्याकरीता सार्वजनिक जलद वाहतुकीचे विविध प्रकल्प हाती घेतले आहेत. यामध्ये उपनगरीय रेल्वे सेवेमध्ये सुधारणा करण्यासाठी एमयुटीपी प्रकल्प, मेट्रो रेल्वे व मोनो रेल्वे सारखे महत्वाकांक्षी पायाभूत प्रकल्प हाती घेण्यात आले असून विविध मेट्रो प्रकल्पांकरीता बृहत आराखडा तयार करण्यात आले आहेत.

तसेच मुंबई व ठाणे शहरातील वाहतूकीची कोंडी कमी करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत वाशी-घाटकोपर व ठाणे-बोरिवली (संजय गांधी उद्यानावरुन) असे दोन हवाई रज्जू मार्ग प्रस्तावित करण्यात आले आहेत.

मेट्रो स्थानकात प्रवेश व बाहेर जाण्याचा मार्ग व स्थानक क्षेत्रातील वाहतूक सुरळीतपणे होण्यासाठी स्थानक क्षेत्रातील वाहतूक नियोजन, बस व रिक्षा स्थानक व गंतव्य यामध्ये नवीन सार्वजनिक परिवहन मार्ग तयार करणे यासारखी कामे प्रस्तावित आहेत.

मुंबई महानगर प्रदेशासाठी सर्वकष परिवहन अभ्यासाचे अद्ययावतीकरण करण्याचे काम सल्लागारामार्फत सुरु असून सदर अभ्यासात लघु, मध्यम आणि दिर्घ मुदतीच्या परिवहन उपायांच्या/ योजनांच्या शिफारशींचे अद्ययावतीकरण करण्याचे नियोजित आहे. तद्नंतर सदर शिफारशींची योग्य व नियोजनबध्द पध्दतीने व टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर नियोजित आहे.

मुंबईत विविध विभागातील मध्य हार्बर रेल्वे मेट्रो-१, मेट्रो-३ या प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना अद्यापी घरे न मिळाल्याबाबत

(४) ३२४४१ (३०-११-०००२). श्री.बसवराज पाटील (औसा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत विविध विभागातील मध्य हार्बर रेल्वे, मेट्रो-१ मेट्रो-२, मेट्रो-३ या प्रकल्पाच्या मार्गातील सुमारे साडेआठ हजार प्रकल्पाबाधितांना प्रश्न वर्षानुवर्ष प्रलंबित असून हया प्रकल्पबाधितांना अद्याप एमएमआरडीएकडून घरे मिळाली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पग्रस्तांना एमएमआरडीएकडून घराचा ताबापत्र देण्यात आले असूनही अद्यापपर्यंत घराचा ताबा दिलेला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्पग्रस्तांना घरे देण्यात विलंब होत असल्याने रेल्वे झोपडपट्टी पुनर्वसन समितीचे अध्यक्ष यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे एक सविस्तर निवेदन दिनांक ७ सप्टेंबर, २०१५ रोजी वा सुमारास सादर केले असून सदरहू प्रकल्पग्रस्तांना विनाविलंब कायमस्वरुपी घरे देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, मुंबईतील विविध प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने काणती उपाययोजना केली वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१८) : (१), (२), (३), (४) व (५) मेट्रो-१ प्रकल्पाने बाधित व पात्र झोपडपट्टीधारकांबाबतची पुनर्वसन प्रक्रीया पूर्ण झाली आहे. मेट्रो-२ अ या प्रकल्पाने बाधित झालेल्या झोपडीधारकांच्या पुनर्वसनाची कार्यवाही पूर्ण झाली असून मेट्रो-२ ब या प्रकल्पाने बाधित प्रकल्पग्रस्तांची कार्यवाही अद्याप सुरु झालेली नाही. मेट्रो -३ या भूमिगत प्रकल्पाने

जवळपास २७४४ निवासी, अनिवासी, औद्योगिक, शासकीय, निमशासकीय राजकिय पक्षांची कार्यालये तसेच फुटपाथवरील बांधकामे इत्यादी बांधकामे बाधित होत असून बीकेसी स्थानकाने बाधित प्रकल्पबाधितांचे लॉटरी काढून मार्च, २०१६ मध्ये प्रथम पुनर्वसन करण्यात आले आहे. तद्नंतर नयानगर (माहिम), सहार, सारीपूत, एमआयडीसी, विधानभवन परिसर, महालक्ष्मी, वरळी, विद्यानगरी, आग्रीपाडा, मरोळ येथील प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. आतापर्यंत एकूण १७६५ प्रकल्पबाधितांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यात आले आहे. गिरगांव-काळबादेवी स्थानकाने बाधित ६३४ प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन त्याच विभागात करण्याचे नियोजित असून तात्पुरते स्थलांतर भाडेतत्वाने करण्यात येत आहे. उर्वरीत प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन २-३ महिन्यात पूर्ण करण्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. मुंबई यांच्यामार्फत करण्याचे नियोजित आहे.

अध्यक्ष, रेल्वे झोपडपट्टी पुनर्वसन समिती यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक ९ ऑक्टोबर, २०१५ रोजी निवेदन सादर केले आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विविध प्रकल्पांनी बाधित व पात्र प्रकल्पग्रस्तांचे शासनाच्या पुनर्वसन धोरणानुसार वेळोवेळी केले आहे. तथापि, जे झोपडीधारक प्रकल्पांनी बाधित नाहीत (एमयुटीपी अंतर्गत रेल्वे हद्दीतील परंतु प्रकल्पाच्या सिमांकन रेषेबाहेरील) व पात्र नाहीत (एमयुटीपी अंतर्गत मेट्रो-१, मिठी नदी प्रकल्प यांतील सक्षम प्राधिकाऱ्याने अपात्र ठरविलेले) अशांचे पुनर्वसन शासनाच्या पुनर्वसन धोरणानुसार करणे शक्य नाही.

मुंबईतील म्हाडाच्या संक्रमण शिबीरांच्या इमारतीमधील रहिवाश्यांच्या पुनर्वसनाबाबत

(५) ४२८०३ (३०-११-०००२). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल मोटे (परांडा) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडाच्या संक्रमण शिबीरांच्या इमारतीमधील रहिवाश्यांच्या पुनर्वसनाबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यस, मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळाची शहर व उपनगरात ५६ संक्रमण शिबीरे असून शिबीरामध्ये सुमारे १० हजार अनधिकृत व्यक्तींनी घुसखोरी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडाने दोन वर्षापूर्वी संक्रमण शिबीराकडे २१ हजार कुटुंबापैकी ८ हजार घुसखोर कुटुंबांना भाडेकरु करुन नियमित करण्याचा प्रस्ताव तत्कालीन शासनाकडे पाठविला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संक्रमण शिबीराकडे मूळ गाळेधारकांसोबत करारनामे करुन रहात असलेली कुटुंबे, खरेदी विक्री कागदपत्रांद्वारे रहात असलेली कुटुंबे दि. ०१ जून, २००९ रोजी रहिवासी असल्याचा पुरावा सादर करावा लागेल व त्यांची वेगळी वर्गवारी करण्याचा तसेच घुसखोर कुटुंबाची वेगळी वर्गवारी असा विचाराधीन प्रस्तावात अंतर्भाव करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर विचाराधिन प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (२४-१०-२०१८) : (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४), (५) व (६) सदर प्रस्ताव शासन विचाराधीन आहे.

दहिसर (पश्चिम) भागात प्राईम इलेगन्स या इमारतीमधील सदनिका विकत घेणाऱ्या ग्राहकांकडे अतिरिक्त रक्कम आकारण्यात येत असल्याबाबत

(६) ५३२९५ (३०-११-०००२). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दहिसर पश्चिम भागात प्राईम ग्रुप मार्फत बांधण्यात आलेली प्राईम इलेगन्स या इमारतीमधील सदनिका विकतांना श्री.भांडारकर या विकासकाकडून सदनिका विकत घेणाऱ्या ग्राहकांकडे अतिरिक्त रक्कम आकारण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू सदनिका विकताना श्री.भांडारकर या विकासकामार्फत डीम्ड कन्वेयन्स व इतर अतिरिक्त रक्कमही आकारण्यात येत असल्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांना सदरहू परिसरातील स्क्वेअर फूटापेक्षा अतिरिक्त २ ते ३ हजार अधिक रक्कम विकासकांला द्यावी लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (२४-१०-२०१८) : (१) व (२) नाही.

अशा प्रकारची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) व (४) सदरहू बाब खाजगी व्यवसायाशी संबंधित व्यवहाराबाबतची असल्यामुळे उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केलेली नाही.तथापि, गृह खरेदी दारांच्या हितांचे रक्षण करण्याच्या हेतूने राज्यामध्ये स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ दि.०१.०५.२०१७ पासून लागू करण्यात आलेला असून त्या अंतर्गत तक्रारदार महारेरा प्राधिकरणाकडे विकासकाची तक्रार करु शकतात.

वांद्रे (पूर्व) येथील कलानगर जंक्शन, वांद्रे-कुर्ला संकुल तसेच सांताक्रुझ जंक्शनवरील वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत

(७) ६५२६७ (०७-०२-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पूर्व) येथील अत्यंत गजबजलेल्या कलानगर जंक्शन, वांद्रे-कुर्ला संकुल तसेच सांताक्रुझ जंक्शनवरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी एमएमआरडीएने उड्डाणपूल बांधण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वडाळा-घाटकोपर-ठाणे-कासार वडवली मेट्रो-४, अंधेरी (पु) ते दहिसर (पु) मेट्रो-७ व डीएन नगर ते मंडाले मेट्रो-२ ब या प्रकल्पांसाठी उड्डाणपूल बांधण्याचा निर्णयही दिनांक २० सप्टेंबर, २०१६ रोजी राज्याचे मुख्य सचिव आणि एमएमआरडीएचे कार्यकारी समितीचे अध्यक्ष यांच्या झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उड्डाणपूलाचे काम किती कालावधीमध्ये पूर्ण करण्यात येणार आहे व या उड्डाणपूलामुळे विस्थापीत होणाऱ्यांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१८) : (१) होय.

(२) प्रश्नाधीन उन्नत मेट्रो रेल्वे प्रकल्प बांधण्याबाबत दिनांक २० सप्टेंबर, २०१६ पूर्वीच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आले आहेत. याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणेः-

अ.क्र.	मेट्रो मार्गिका	कार्यकारी समितीचा बैठक क्रमांक व दिनांक
१	मेट्रो मार्गिका क्र.७ अंधेरी (पू) ते दहिसर (पू)	बैठक क्र. १३८ दि.२६.०८.२०१५
२	मेट्रो मार्गिका क्र.२ब डी.एन.नगर ते मंडाले	बैठक क्र.१३९ दि. २१.०३.२०१६
३	मेट्रो मार्गिका क्र.४ वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली	बैठक क्र.१४० दि.०३.०६.२०१६

(३) कलानगर येथील उड्डाणपूल जुलै, २०१९ अखेर व सांताक्रूझ जंक्शन येथील उड्डाणपूल ऑक्टोबर, २०१९ अखेर मेट्रो-७ व मेट्रो- २ब २०१९ पर्यन्त, मेट्रो -४ २०२१ पर्यन्त पूर्ण करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे नियोजन आहे. सद्य:स्थितीत या उड्डाणपूलामुळे एकही गाळेधारक बाधित होत नसल्यामुळे त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. प्रश्नाधीन मेट्रो मार्गामूळे बांधितांचे पुनर्वसन एमयुटीपीच्या पुनर्वसन धोरणाप्रमाणे करण्यात येणार आहे.

मुंबईसह राज्यात बांधकाम व्यावसायिकाकडून होत असलेली फसवणूक

(८) ६५६८१ (२७-०१-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.विजय औटी (पारनेर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बांधकाम व्यावसायिकांकडून घरांचा ताबा न देणे व भोगवटा प्रमाणपत्र देण्यास दुर्लक्ष केल्या प्रकरणाबाबत विकासका विरोधात मुंबईच्या ग्राहक वाद आयोगाकडे सुमारे १,५२४ प्रकरणे न्याय मिळविण्यासाठी नागरीकांनी दाखल केल्याची बाब दिनांक ८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात घर खरेदीत विकासकाकडून झालेल्या फसवणूकीची सुमारे १६ हजार प्रकरणे ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या विविध कार्यालयामध्ये प्रलंबित असल्याची माहिती दिनांक ६ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास मुंबईतील ५ हजार ८०० इमारतीतील अडीच लाख भाडेकरुंना पुनर्विकास करण्याचे आश्वासन देऊन विकासकाने भाडयाने राहण्यास अन्य ठिकाणी घरे दिली परंतू अद्यापही पुनर्विकास प्रकल्प पूर्ण करुन घराचा ताबा दिला नसल्याची माहिती निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने, गंभीर दखल घेवून, घर करणारे ग्राहक तसेच भाडेकरु यांना विनाविलंब न्याय देवून त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने अद्याप शासनाने मोफा आणि केंद्रीय रिअल ईस्टेट अधिनियमाची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (२९-१०-२०१८) : (१) व (२) अंशत: खरे आहे.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अखत्यारीखालील राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांच्या अहवालानुसार आयोग तसेच आयोगाच्या अधिनस्त असलेल्या राज्यातील सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे “Housing” या कॅटेगरीखाली दि. १६.०१.२०१७ रोजी एकूण १७,३४२ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या व त्यापैकी एकूण ११,३९९ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

(३), (४) व (५) मुंबईतील बऱ्याच जुन्या इमारतींच्या पुनर्विकासामध्ये संबंधित भाडेकरु व विकासक यांच्यामधील वाद, न्यायालयीन प्रकरणे तसेच इतर कारणांमुळे प्रकल्प पूर्ण झाले नाहीत ही बाब खरी आहे.

स्थावर संपदा क्षेत्रातील व्यवहारात पारदर्शकता आणणे व ग्राहकांचे हित जपण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ ची दि. ०१ मे, २०१७ पासून राज्यात अंमलबजावणी करण्याची कार्यवाही सुरु केली आहे.

मोहाडी, तुमसर (जि.भंडारा) येथे गृहनिर्माण योजना सुरु करण्याबाबत

(९) ८०४७६ (२०-०४-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी, तुमसर (जि.भंडारा) येथे गृहनिर्माण योजना सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान मा.गृहनिर्माण मंत्री यांनी मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (२४-१०-२०१८) : (१) व (२) हे खरे नाही.

सन २०२२ पर्यंत देशाला स्वातंत्र मिळून ७५ वर्षे पूर्ण होत असताना देशातील प्रत्येक कुटुंबाला पक्के घर असायला हवे या हेतूने मा.पंतप्रधान, भारत सरकार यांनी जून,२०१५ मध्ये 'सर्वांसाठी घरे' या संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजनेची घोषणा केली आहे. या योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने मंत्रिपरिषदेच्या मान्यतेने दि.९.१२.२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. केंद्र शासनाने आतापर्यंत ३८२ शहरांमध्ये प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यास मान्यता दिली आहे, त्यामध्ये मोहाडी आणि तुमसर जि.भंडारा या नगरपरिषदांचा समावेश करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी तालुक्यातील (जि.ठाणे) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांना अनुदान वितरित करण्याबाबत

(१०) ८२३३३ (२०-०४-२०१७). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी तालुक्यातील (जि.ठाणे) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ९६६ पैकी ५५७ लाभार्थ्यांचा पहिला हप्ता ऑनलाईन त्यांच्या खात्यावर जमा झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत लाभ केव्हापर्यंत मिळणार आहे व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

श्री. प्रकाश महेता (२६-१०-२०१८) : (१) भिवंडी शहर व तालुक्यातील कुठलाही प्रकल्प प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीकडून मंजूर झालेला नाही. त्यामुळे सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.

सिडको प्रशासनाने सन १९९५ ते २००६ दरम्यान मागासवर्गातील नियुक्त्या केलेल्या अधिकारी व कर्मचा-यांची जात पडताळणी झाली नसल्याबाबत

(११) ८५९४० (२३-०८-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडको प्रशासनाने सन १९९५ ते २००६ दरम्यान अनुसूचित जाती, जमाती आणि मागासवर्गातील नियुक्त केलेल्या ७० हून अधिक अधिका-यांची व कर्मचा-यांची जात पडताळणी झाली नसल्याची बाब दिनांक १४ जून,१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय सेवेत दाखल झाल्यानंतर ६ महिन्यात जात पडताळणी झाल्याशिवाय अधिकारी व कर्मचारी सेवेत कायम केला जाऊ नये असे शासनाचे धोरण असताना सिडकोने शासनाच्या आदेशाकडे दूर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिडकोचे मुख्य जनसंपर्क अधिकारी यांचीही जात पडताळणी केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सिडकोत प्रवर्गांच्या जागांवर बिगर मागासवर्गीय अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून चौकशीत दोषी असणा-या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१८) : (१) व (२) अनुसूचित जमाती प्रवर्गातील ७० अधिकारी / कर्मचाऱ्यांची जात पडताळणी झाली नसल्याची बातमी दि.१४.०६.२०१७ रोजी एका वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झाली होती, हे खरे आहे.

तथापि, सिडकोमध्ये सन १९९५ ते २००१ या कालावधीत ३० अधिकारी / कर्मचारी नियुक्त झाले आहेत. सन १९९५ ते २००६ या कालावधीमध्ये नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांपैकी एकूण १६ कर्मचाऱ्यांनी (अनुसूचित जाती-२, अनुसूचित जमाती-१० व इतर मागासवर्ग-४) जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. त्यामुळे सिडकोकडून संबंधित कर्मचाऱ्यांना जातपडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याबाबत नोटीसा बजावण्यात आल्या याबाबत संबंधित कर्मचा-यांनी सादर केलेल्या खुलाशांती अनुसूचित जमातीच्या एका कर्मचाऱ्याची सेवा संपुष्टात आलेली असून उर्वरित प्रकरणे मा. न्यायालयात न्यायप्रविष्ठ असून काही प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत.

(३) सिडकोतील श्री. मोहन निनावे, वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी यांची 'हलबा' या अनुसूचित जमाती प्रवर्गातून दि.१५.१.१९९६ रोजी नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, जात पडताळणी समिती, नागपूर यांनी श्री.निनावे यांचा 'हलबा' या अनुसूचित जमातीचा दावा अवैध ठरवून त्यांचेवर कारवाई करण्याबाबत दि.१५.०२.२०१८ रोजीच्या आदेशान्वये केलेल्या शिफारशीस अनुसरुन श्री. निनावे यांची दि.७.९.२०१८ रोजीच्या आदेशान्वये सिडको महामंडळामधील सेवा संपुष्टात आणण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

उरण (जि.रायगड) येथील प्रकल्पग्रस्त शैक्षणिक व सामाजिक विकास संस्थेला मंजूर केलेल्या भूखंडावर आकारण्यात आलेला डेव्हलपमेंट चार्ज रद्द करण्याबाबत

(१२) ८६४२५ (२३-०८-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि. रायगड) येथील प्रकल्पग्रस्त शैक्षणिक व सामाजिक विकास संस्थेला मंजूर केलेल्या भूखंडावर सिडकोतर्फे आकारण्यात आलेला डेव्हलपमेंट चार्ज रद्द करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी विनंती केल्यानुसार त्याबाबतचा सविस्तर अभिप्राय व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, (सिडको), मुंबई यांचेकडून शासनास प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, या अभिप्रायानुसार शासनाने निर्णय घेतला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१८) : (१) व (२) उरण तालुका प्रकल्पग्रस्त शैक्षणिक व सामाजिक संस्थेने त्यांच्या सेक्टर १५ ए, द्रोणागिरी येथील प्लॉट क्र. २ वर अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या (उच्च शिक्षणासाठी) बांधकाम परवानगीसाठी केलेला अर्ज सिडकोस प्राप्त झाला आहे.

उच्च शैक्षणिक प्रयोजनार्थ असलेल्या भूखंडावरील बांधकाम परवानगीसाठी आकारण्यात येणारे विकास शुल्क भरण्यापासून दि.२४.५.१९९३ रोजीच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२४ (२) प्रमाणे सूट लागू होत नाही. ही तरतूद विचारात घेवून सदरहू संस्थेस विकास शुल्क भरण्याविषयी सिडकोने दि.१५.११.२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सदरहू दि.२४.५.१९९३ च्या शासन निर्णयातील तरतूद स्वयंस्पष्ट असल्याने, याबाबत शासनस्तरावरुन वेगळ्याने निर्णय घेण्याची आवश्यकता नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधित दगडखाणीच्या पुनर्वसनाबाबत

(१३) ८६४२८ (२३-०८-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधित दगडखाणीच्या पुनर्वसनाबाबत प्रकल्प बाधित दगडखाण मालक संघटनेने वारंवार व्यवस्थापकिय संचालक, सिडको यांना लेखी निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार दगडखाणीच्या पुनर्वसनाबाबत कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१८) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ गाभा क्षेत्र बाधित दगडखाणी व क्रशर यांचे पुनर्वसन म्हणून पर्यायी भूखंड देणेबाबत मा.लोकप्रतिनिधी यांचे दि.९.६.२०१७ रोजी निवेदन सिडकोस प्राप्त झाले आहे.

सदर निवेदनातील एकूण १४ प्रकल्पग्रस्त दगडखाण व क्रशर धारकांना मौजे ओवळे येथील सर्व्हे नं.१९२/अ येथे १ वर्षाच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात पर्यायी जागा देण्याच्या प्रस्तावास सिडकोने दि.०५.१०.२०१७ रोजी मान्यता दिली आहे.

सिडकोच्या दि.०४.०४.२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये उक्त १४ प्रकल्पग्रस्तांपैकी ज्यांची गाभा क्षेत्रात येत असलेली घरे त्यांनी स्वत:हून निष्काषित केल्यास त्यांना तात्पुरत्या स्वरुपातील क्रशर चालविण्यासाठी देऊ केलेल्या भूखंडाचा संमती नि परवानगी (Leave & License) करारनामा करुन प्रवेश अनुमती देण्याबाबत निदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार सदरहू १४ प्रकल्पग्रस्तांपैकी ५ प्रकल्पग्रस्तांनी त्यांची घरे निष्काषित करुन दगड व उत्खनन क्रशर चालविण्यासाठी दि.७.९.२०१८ रोजी सिडकोकडे अर्ज सादर केले असून त्यावर सिडकोमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. उर्वरित ९ प्रकल्पग्रस्तांनी गाभा क्षेत्रात येणारी त्यांची घरे स्वत:हून निष्काषित केल्यानंतर त्यांना नियमानुसार दगड व उत्खनन क्रशर चालविण्यासाठी परवानगी देण्याची तजवीज सिडकोकडून ठेवण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुद्रांक शुल्क अधिभारापोटी जमा होणारी रक्कम हस्तांतरित होण्यास विलंब लागत असल्याबाबत

(१४) ९०९९९ (१२-०८-२०१७). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानगरपालिका हद्दीतील व्यवहारावर आकारण्यात येणारे अतिरिक्त १ टक्का मुद्रांक शुल्क अधिभारापोटी जमा होणारी रक्कम शासनाकडून जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वसई-विरार शहर महानगरपालिकेस प्राप्त होण्यास विलंब लागत असल्याबाबतचे निवेदन माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिरिक्त १ टक्का मुद्रांक शुल्क अधिभारापोटी जमा होणारी रक्कम हस्तांतरित होण्यास लागणारा विलंब टाळण्यासाठी सदर रक्कम तालुका निबंधक स्तरावरून महानगरपालिकेकडे वर्ग करण्याबाबतची मागणीही सदरहू निवेदनाद्‌वारे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) • मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ अन्वये स्थावर मालमत्तेची विक्री किंवा देणगीच्या बाबतीत मालमत्तेच्या मूल्यावर व फलोपभोग गहाण या संलेखाच्या बाबतीत संलेखात मांडण्यात आलेल्या संलेखाद्वारे सुरक्षित रकमेवर १% या दराने अधिभार आकारुन वाढ केल्यामुळे जमा होणाऱ्या रकमेचे वितरण संबंधीत महानगरपालिकेस करण्याबाबतची कार्यपध्दती नगरविकास विभाग शा.नि. १८ मार्च, २०११ अन्वये विहित करण्यात आली आहे.

• त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रात नोंदणी महानिरीक्षक यांचे अधिनिस्त दुय्यम निबंधक कार्यालयाकडून स्थानिक स्वराज्य संस्था कराचा १% अतिरीक्त मुद्रांक शुल्क अधिभाराची जमा रकमेची तिमाही कालावधीची माहिती नोंदणी महानिरीक्षक पुणे, यांचे मार्फत या विभागास प्राप्त झाल्यानंतर सदर माहितीच्या आधारे शासनाकडून अनुदान मंजूर होऊन शासन संबंधित जिल्हाधिकारी यांना परस्पर अनुदान वितरीत करते व जिल्हाधिकारी मार्फत संबंधित महानगरपालिकांना अनुदान वितरीत केले जाते.

• सदरच्या पध्दतीमध्ये बदल करण्याची बाब सद्यस्थितीत शासनाच्या विचारधीन नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबईच्या धर्तीवर सिडको नाशिक येथील सिडकोची घरे फ्री होल्ड करण्याबाबत

(१५) ९४३३० (२३-०८-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सिडको प्रशासनाने प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी विकत घेऊन त्या जागेवर सर्वसामान्य नागरीकांना परवडतील अशा दरात घरांचे बांधकाम केले असून ही सर्व घरे सिडकोने नागरीकांना ९९ वर्षाच्या करारावर दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको प्रशासनाने एक ते सहा योजनांमध्ये घरांची निर्मिती केल्यानंतर रहिवाशांना दिलेल्या अटी-शर्तीची पुर्तता केली नसुन मुलभूत सुविधा पुरविल्या नाहीत, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, सिडको प्रशासनाने नागरीकांना कोणत्याही मुलभूत सुविधा पुरविल्या नसल्याने प्रशासनाने रहिवाशांना कराराने दिलेली संपुर्ण घरे ही फ्री होल्ड करण्याची मागणी सिडको येथील नागरिकांकडून होत आहे, हेही खरे आहे काय.

(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी नवी मुंबईच्या धर्तीवर सिडको नाशिक येथील सिडकोची घरे फ्रि होल्ड करण्याबाबतचे लेखी निवेदन दिनांक २८ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री यांना देण्यात आले होते, हेही खरे आहे काय.

(५) असल्यास, याबाबत शासनाने सिडकोची घरे फ्री होल्ड करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) सिडकोने अधिसूचित केलेल्या क्षेत्राचा विकास करताना सदरहू क्षेत्राची १२ शेजारगटांमध्ये विभागणी करुन सहा गृहनिर्माण योजनांमध्ये २४५६९ घरे बांधली असून विविध वापराचे अंदाजे ५००० भूखंड रेखांकित केले आहेत. सदर अधिसूचित क्षेत्रामध्ये शाळा, महाविद्यालये, सामाजिक सुविधा भूखंड, मध्यवर्ती सुविधा केंद्रे, आरोग्य केंद्रे , सिनेमागृह भूखंड, खुल्या जागा, स्टेडीयम, मध्यवर्ती उद्यान, मैदाने, मलनिस्सारण केंद्रे, रस्ते, पदपथ, पथदिवे, भुयारी गटारे, पाणी पुरवठा योजना, भुपृष्ठ व भूमिगत पाण्याच्या टाक्या, स्मशानभूमी इ. सर्व सुविधा पुरविल्या आहेत. या सर्व सामाजिक सेवा सुविधा देखभाल दुरुस्तीस्तव सिडकोमार्फत नाशिक महानगरपालिकेकडे हस्तांतरित केल्या आहेत.

तसेच दि.१४.१०.२०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये नवीन नाशिक अधिसूचित क्षेत्राकरिता सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून केलेली नियुक्ती संपुष्टात आली असून नाशिक महानगरपालिका यांची नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(४) व (५) स्थानिक लोकप्रतिनिधींनी नवी मुंबईच्या धर्तीवर सिडको नाशिक येथील सिडकोची घरे फ्रि होल्ड करण्याबाबत दि.२०.०७.२०१७ रोजी सिडको, नाशिक यांना निवेदन दिलेले आहे.

त्याचदरम्यान नवी मुंबईतील सिडकोच्या मालकीच्या जमिनी फ्री होल्ड करण्याबाबत सिडको संचालक मंडळाने दि.११.०८.२०१७ रोजी ठराव पारित केला असून सदर ठरावात औरंगाबाद, वाळूज, नाशिक इ.ठिकाणच्या सिडको क्षेत्रातील जमिनींबाबत निर्णय घेण्यास व्यवस्थापकीय संचालकांना प्राधिकृत करण्यात आले आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने व्यवहार्यता अहवाल सिडकोकडून प्राप्त झाला असून त्याआधारे सदर प्रस्तावाबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेऊन उचित निर्णय घेण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

भेंडीबाजार (मुंबई) येथील पाकमोडीया स्ट्रीट वरील हुसैनी ही ११७ वर्षाची जुनी पाच मजली इमारत कोसळून झालेला अपघात

(१६) ९४९७० (१३-१०-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भेंडीबाजार (मुंबई) येथील पाकमोडीया स्ट्रीट वरील हुसैनी ही ११७ वर्षाची जुनी पाच मजली इमारत दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ वा त्या दरम्यान अतिवृष्टीमुळे कोसळून येथील ३४ रहिवाशांना आपला जीव गमवावा लागला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारत दुर्घटनेची चौकशी करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इमारत दुर्घटनेतील मृत व्यक्तींच्या वारसांना व जखमींना शासनाने कोणत्या स्वरुपाची मदत केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,
(५) असल्यास, मुंबई शहरामध्ये अशा घटना यापूर्वीही घडल्या असून मुंबई शहर, उपनगरे व इतर ठिकाणच्या जुन्या इमारतीचे लवकरात लवकर पुनर्वसन करून रहिवाशांना दिलासा देणेबाबत शासनाचे कोणते धोरण आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (२३-१०-२०१८) : (१) होय, हे अंशत: खरे आहे. भेंडीबाजार (मुंबई) येथील पाकमोडीया स्ट्रीट वरील हुसैनी हि इमारत तळ + ५ मजले + १ मजल्यांची (non tallying) होती, सदर इमारतीच्या दुर्घटनेत १५ व्यक्ती जखमी झाल्या असून ३३ व्यक्ती (२४ पुरूष व ०९ स्त्रिया) मृत झाले होते.
(२) सदर इमारतीच्या दुर्घटनेबाबत उपमुख्य अभियंता (परिमंडळ-१), दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी प्राथमिक चौकशी अहवाल सादर केला आहे.
(३) सदर इमारत दुर्घटनेतील मृत व्यक्तींच्या वारसांना व गंभीर जखमी व्यक्तींना जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयाकडून दि.१२.१२.२०१७ रोजी प्राप्त झालेल्या अहवालानुसार मयत ३३ व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी रुपये २.०० लक्ष (रुपये दोन लक्ष मात्र) प्रमाणे ६६,००,०००/- (रुपये सहासष्ठ लक्ष मात्र), तसेच १२ गंभीर जखमी व्यक्तींना प्रत्येकी रुपये ५०,०००/- (रुपये पन्नास हजार मात्र) प्रमाणे रुपये ६,००,०००/- (रुपये सहा लक्ष मात्र) असे एकूण रुपये ७२,००,०००/- (रुपये बहात्तर लक्ष मात्र) वाटप करण्यात आलेले आहे.
(४) सदर इमारत दुर्घटनेबाबत उपमुख्य अभियंता (परिमंडळ-१), दुरुस्ती व पुनर्ररचना मंडळ यांनी प्राथमिक चौकशी केली असून सदर चौकशीत खालील बाबी आढळून आल्या.
१. सदर "हुसैनी बिल्डींग" सुमारे ११७ वर्षे जुनी होती.
२. सदर इमारत ही तळ + ५ + १ (non-tallying) मजली लोड बेअरींगची होती व ही इमारत अरूंद भुखंडावर बांधण्यात आलेली होती. (Plot area १०७.८६ as per P.R. Card)
३. या इमारतीच्या शेजारी बिगर उपकरप्राप्त शेड होते व सदर शेडलगतची पहिल्या मजल्यापासुन सहाव्या मजल्यापर्यंत भिंत उघडी (exposed wall) होती. तसेच दुर्घटनेच्या एक दिवस आधी दि.२९.०८.२०१७ रोजी अति मुसळधार पाऊस, जोरदार वारे तसेच मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी भरले होते. तसेच दि.२९.०८.२०१७ पूर्वीच्या कालावधीतही भरपुर पाऊस चालुच होता. सततच्या मुसळधार पावसामुळे सदर इमारतीच्या भिंतीमध्ये पाणी झिरपत होते. अशा परिस्थितीत ११७ वर्षे जुनी असलेली इमारत अतिवृष्टीच्या नैसर्गिक आपत्तीमुळेच अचानक कोसळली असल्याचे निदर्शनास येते.

(५) जुन्या उपकर प्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलदगतीने होण्याकरिता दि.२९.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये विधीमंडळातील ८ आमदारांची समिती गठीत करण्यात आली असून, सदर समितीचा अहवाल प्राप्त झाला असून त्याप्रमाणे म्हाड अधिनियम, १९७६ व विकास नियंत्रण नियमावली ३३(७) व ३३(९) मध्ये सुधारणा करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

पनवेल (जि.रायगड) येथील खालचा ओवळा गावाचे पुनर्वसन करण्याबाबत

(१७) ९५२०२ (३०-१२-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथील खालचा ओवळा गावाचा दहा गाव समितीत समावेश करुन त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत माजी खासदार व ग्रामस्थ आणि सिडकोचे पदाधिकारी यांच्यामध्ये माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सिडको भवन येथे बैठक झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत ग्रामस्थांभकडून इतरही प्रश्नांबाबत चर्चा करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१८) : (१) हे खरे नाही.

नियोजित नवी मुबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विकासानंतर खालचे ओवळे गावाच्या पूर परिस्थितीबाबत केलेल्या अभ्यासाचे सादरीकरण करण्यासंदर्भात सदर बैठक दि.२७.१०.२०१८ रोजी झाली होती.

(२) व (३) सदर बैठकीमध्ये केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र, पुणे (CWPRS) यांनी केलेल्या शिफारशींनुसार विमानतळापुर्वी व विमानतळबांधणी नंतर उद्भवणा-या संभाव्य परिस्थितीबाबत केलेल्या अभ्यास अहवालाच्या अनुषंगाने सिडकोने केलेल्या कार्यवाहीबाबत चर्चा झाली असून केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र, पुणे (CWPRS) यांनी केलेल्या शिफारशींनुसार सिडकोकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चारकोप कांदीवली (मुंबई) सेक्टर नंबर ५, प्लॉट नं. ५४० मधील
अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेबाबत

(१८) ९५५७४ (३०-१२-२०१७). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चारकोप कांदिवली (मुंबई) सेक्टर ५, प्लॉट नं. ५४० मधील उर्वी दर्शन को.ओपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी मधील अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यास म्हाडा क्षेत्रविकास महामंडळामार्फत आयुक्तांना दिनांक ६ जुलै, २००४ रोजी वा त्यासुमारास पत्र देवूनही सदर सोसायटीतील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (२३-१०-२०१८) : (१) व (२) हे अशंत: खरे आहे.

कांदीवली चारकोप प्लॉट क्र. ५४०, उर्वीदर्शन सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सदनिका डी८ ची दि. ०७.०७.२०१८ रोजी म्हाडाद्वारे स्थळपाहणी करण्यात आली. सदर सदनिका ४० चौ. मी. भूखंड क्षेत्रफळाची असुन ०.८५ चटई क्षेत्र निर्देशांकानुसार त्यास तळ मजल्याचे ३४ चौ. मी. बांधकाम क्षेत्रफळ अनुज्ञेय आहे. तथापि प्रत्यक्षात सदर सदनिकाधारकाने तळ+१ मजल्याचे बांधकाम केले असून पहिल्या मजल्याचे बांधकाम अनधिकृत होत आहे. यापूर्वी अशा अनधिकृत बांधकामावर पदनिर्देशीत अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारती व कारखाने) / बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे तर्फे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये कारवाई होत होती. तथापि, आता म्हाडास दि. २३.०५.२०१८ च्या पत्रान्वये नियोजन प्राधिकरण केल्यामुळे म्हाडाच्या ११४ अभिन्यासातील अतिक्रमणे हटविण्याबाबत तसेच जुन्या इमारतींची पाहणी करुन धोकादायक इमारतीच्या रहिवाश्यांना सुचना देण्याबाबत उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांच्या दि. ०६.०८.२०१८ च्या आदेशान्वये, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम ५३,५४,५५,५६ व ५७ च्या अधिन राहून, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या विभागीय कार्यकारी अभियंत्याना कार्यवाही करण्याचे आदेशित केले आहे, असे मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) नसलेल्या इमारतींनाही मानवी अभिहस्तांतरण (डीम्ड कन्व्हेन्स) देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

(१९) ९५७९० (३०-१२-२०१७). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे नवी मुंबई, पुणे, नागपूर हद्दीत अनेक इमारती उभ्या राहिल्या असून यातील अनेक इमारतींना अद्यापपर्यंत भोगवटा प्रमाणपत्रे मिळाली नसल्याने या इमारतींना डीम्ड कन्व्हेअन्स (मानवी अभिहस्तांतरण) करण्यात अनेक अडचणी येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जमीनीच्या मालकीवरुन सोसायटी आणि विकासकांमधील वादामुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा विकास रखडल्याने शासनाने भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) नसलेल्या इमारतींनाही मानवी अभिहस्तांतरण (डीम्ड कन्व्हेन्स) देण्याचा निर्णय दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासाठी अर्ज करणाऱ्या गृहनिर्माण सोसायटयांना आपण इमारतीसंदर्भातील सर्व जबाबदारी स्वीकारत असल्याचे स्वयं घोषणापत्र द्यावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे व या निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (१८-०७-२०१८) : (१), (२), व (३) होय.
(४) तथापी, मानीव अभिहस्तांतरणाची प्रक्रिया सुलभ करण्याच्या दृष्टीने यापूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करुन सरकार विभागामार्फत दि. २२.०६.२०१८ रोजी सर्व समावेशक असा शासन निर्णय निर्गमित केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथील शाळांच्या १७५ वर्गाच्या खोल्यांकरीता एमएमआरडीएने निधी मंजूर केल्याबाबत

(२०) ९८९१७ (०३-०१-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथील शाळांच्या १७५ वर्गाच्या खोल्यांकरीता एमएमआरडीएने आवश्यकता नसतानाही १ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१८) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्नांधिन निधीसंदर्भातील प्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्राप्त झालेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे, स्वारगेट ते कात्रज मेट्रो प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत

(२१) १०४८८२ (१९-०४-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, स्वारगेट ते कात्रज मेट्रो प्रकल्प कार्यान्वित करण्याचे शासनाच्या विचारधीन असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहतुक कोंडीमुळे वाहनचालकासह स्थानिक नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता मा.मुखमंत्री यांनी सकारात्मकता दर्शविली असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वारगेट ते कात्रज प्रकल्प उभारण्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे व सदर खर्च कशाप्रकारे उभारण्याचे प्रस्तावित आहे तसेच या प्रकल्पासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१८) : (१), (२), (३) व (४) पुणे महानगरपालिकेने दि. ४ जानेवारी, २०१८ रोजी पिंपरी चिंचवड ते स्वारगेट या मेट्रो मार्गिकेचा विस्तार कात्रज पर्यन्त करण्याकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबत महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महा-मेट्रो) यांना कळविले होते. त्यानुषंगाने महामेट्रोमार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी दिनांक ३१.०१.२०१८ रोजी सल्लागाराची नेमणूक करण्यात आली असून सल्लागारामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही महामेट्रोच्या स्तरावर सुरु आहे. शासन निर्णय क्रंमाक पीएमआर- ३३१३/प्र.क्र.२९/नवि-७, दिनांक २९ ऑक्टोंबर, २०१३ अन्वये पुणे महानगर मेट्रो प्रकल्पाच्या पिंपरी ते निगडी आणि स्वारगेट ते कात्रज (एकूण १५ कि.मी. वाढीव लांबी) या वाढीव मेट्रो मार्गिकेस तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

तसेच सदर विस्तारीत मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर त्याचा अपेक्षित खर्च व त्यासाठी लागणाऱ्या निधीची उभारणी याबाबतची माहिती उपलब्ध होऊ शकेल.

दादर-माहिम (मुंबई) परिसरातील २१ गृहनिर्माण प्रकल्पांची कामे विकासकांनी प्रलंबित ठेवल्याबाबत

(२२) १०५२४४ (०३-०४-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर-माहिम (मुंबई) परिसरातील २१ गृहनिर्माण प्रकल्पांची कामे विकासकांनी प्रलंबित ठेवली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्प प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत व या प्रलंबित असलेल्या प्रकल्पांपैकी चार प्रकल्प म्हाडाने स्वतः राबविण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाच्या बांधकामांची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. प्रकाश महेता (२३-१०-२०१८) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.
दादर-माहिम (मुंबई) परिसरात २१ गृहनिर्माण प्रकल्प प्रलंबित नसून जवळपास १५ गृहनिर्माण प्रकल्प प्रलंबितआहेत.
(२) याबाबत दादर-माहिम परिसरातील पुनर्विकास प्रकल्प प्रलंबित असण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

- काही विकासकांनी विक्रीयुक्त भागातील एकच गाळा ०२ व्यक्तिस विकलेला आहे.
- सद्यस्थितीत विकासकांची आर्थिक स्थिती अतिशय खराब आहे.
- काही विकासक दिवाळखोर झाले आहेत.
- विकासक मरण पावल्यामुळे, तसेच विकासक तुरुंगात असल्यामुळे उक्त प्रकल्प प्रलंबित आहे.

प्रंलबित असलेल्या प्रकल्पांपैकी कोणताही प्रकल्प म्हाडाने स्वतः राबविण्याचा निर्णय घेतलेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

दिवागाव ऐरोली सेक्टर-९ येथील स्मशानभूमी व तलावासमोरील भूखंडावर मासळी मार्केट उभारण्याबाबत

(२३) १०५४५३ (१२-०४-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील दिवागाव ऐरोली येथे मच्छीमार कोळी बांधव मोठ्या संख्येने राहत असूनही तेथे मच्छीमार्केट नसल्याने मच्छीमार बांधवांची गैरसोय होते आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवी मुंबईची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने मच्छीमार बांधवांसाठी दिवागाव ऐरोली सेक्टर-९ येथील स्मशानभूमी व तलावासमोरील भूखंडावर मच्छीमार्केट उभारण्यात यावे म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २ जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान व्यवस्थापकीय संचालक सिडको यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१८) : (१), (२) व (३) अशा प्रकारचे निवेदन सिडको महामंडळाकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

तथापि, सिडकोच्या नियोजन विभागाच्या अभिप्रायानुसार ऐरोली येथील सेक्टर-९ च्या रेखांकन नकाशानुसार सेक्टर-९ मधील भूखंड क्र. डी-८८ हा मार्केट स्टॉलसाठी अधोरेखित केलेला असून सदरील भूखंडाची सिडकोच्या सर्व्हे विभागामार्फत मोजणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुण्यातील हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो रेल्वे प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागिदारी तत्वावर पीएमआरडीएमार्फत राबविण्याबाबत

(२४) १०७७३४ (१८-०४-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो रेल्वे प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागिदारी (पी.पी.पी.) तत्वावर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (पीएमआरडीए) राबविण्यास शासनाने मंजूरी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मेट्रो रेल्वेची लांबी किती किलोमीटर आहे व यासाठी किती कोटी रुपयांचा खर्च येणार आहे,

(३) असल्यास, सदर मेट्रो प्रकल्प विहीत मुद्दतीत पुर्ण व्हावा यासाठी शासनाने किती निधी उपलब्ध करुन दिला आहे वा त्यानुषंगाने प्रकल्पाच्या कामाबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१८) : (१) होय.

(२) सदर मेट्रो प्रकल्पाची लांबी २३.३ कि.मी. असून सदर प्रकल्पाचा पूर्णत्वाचा एकूण खर्च रु. ८३१३ कोटी इतका आहे.

(३) सदर प्रकल्पासाठी व्यवहार्यता तफावत निधी पोटी रु.१२२५ कोटी देण्यास केंद्रशासनाने तत्वत: मान्यता दिली आहे. तसेच राज्यशासनाच्या हिश्श्याची रु.१२२५ कोटी रोखीने न देता तितक्या किंमतीच्या शासकिय जमिनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला हस्तांतरीत करुन या जमिनीची रोखीकरण करुन राज्यशासनाचा व्यवहार्यता तफावत निधीचा हिस्सा सदर प्रकल्पासाठी उपलब्ध करण्याचे नियोजित आहे. सदर प्रकल्पासाठी ट्रिल अर्बन ट्रान्सपोर्ट प्रा.लि. ॲन्ड सिमेन्स प्रोजेक्ट व्हेन्चर्स जीएमबीएच या एकमेव निविदाकाराने निवीदा भरली असून सदर निवीदेस दिनांक २९.०८.२०१८ रोजी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाच्या सवलत करारनाम्यास शासनाची मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर तपासण्यात येत आहे.

मुंबई महानगर विकास प्रधिकरणामार्फत भाईंदर खाडीवरील पुल बांधण्याचा प्रस्ताव

(२५) ११०३८८ (०३-०४-२०१८). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर विकास प्रधिकरणामार्फत भाईंदर खाडीवरील पूल बांधण्याचा प्रस्ताव मगील अनेक वर्षापासून मंजुर असुनही अद्याप कामास सुरवात झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असलयास, मुंबई मेट्रो रेल्वे दहिसरपर्यंत आणण्याचा शासनाचा प्रस्ताव असून दहिसरपर्यंत येणाऱ्या मेट्रो रेल्वे प्रकल्पास वसई-विरारपर्यंत आणण्यासाठी भाईंदर खाडीवर मंजूर असलेल्या पुलाच्या कामामध्ये सदरहु पुलाचा समावेश करण्याबाबतच्या मागणीचे निवेदन मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु निवेदनातील मागण्यांचे स्वरुप काय आहे, तसेच उक्त निवेदनातील मागण्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१८) : (१), (२), (३) व (४) प्रश्नांकीत प्रकल्प सुरुवातीस महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून राबविण्याचे प्रस्तावि होते. परंतु महामंडळाकडून सदर कामासाठी विलंब होत असल्यामुळे सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्याचे ठरले. सदर प्रकल्पासाठी मे. स्टूप कन्सल्टंट प्रा. लि. या प्रकल्प व्यवस्थापन सल्लगारा कडून प्राधिकरणाने अहवाल घेतला आहे. (३+३ मार्गिका) लांबी ४.९८ कि.मी. व रुंदी ३०.६०. मी. इतक्या आकारमानाच्या पुलाच्या बांधकामाकरीता प्राधिकरणाने दिनांक २६.३.२०१५ रोजी रु. ८७५.५४ कोटी एवढया रकमेस प्रशासकीय मान्यता दिली होती. त्यानंतर प्राधिकरणाने दिनांक १२.१.२०१८ रोजी रु. १५०१.१६ कोटी इतक्या रकमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली आहे. सद्य:स्थितीत निविदापूर्व प्रक्रीयेची कामे प्रगतीपथावर आहेत.

मंगळवेढा (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) नगरपालिका येथे अपुरे कर्मचारी असल्याबाबत

(२६) ११०९६४ (०३-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) नगरपालिका येथे अपुरे कर्मचारी असल्याने व नवीन पदे न भरल्यामुळे कर्मचाऱ्यांअभावी शहरातील स्वच्छतेसाठी नगरपालिकेला ठेकेदारावर अवलंबून रहावे लागत असल्याने शहरवासियांना आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंगळवेढा नगरपालिकेत एकूण कर्मचाऱ्यांच्या पदापैकी आरोग्य विभागात ४६ पदे, पाणी पुरवठा विभागात १८ पदे, ऊर्जा विभागात ५ पदे, बांधकाम विभागात ३ पदे व

अग्निशामक विभागात ४ पदे अशी रिक्त पदे तातडीने भरण्याची आवश्यकता असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पूर्वीपेक्षा मंगळवेढा शहरातील लोकसंख्या वाढल्यामुळे ५०० लोकसंख्येसाठी एक कर्मचारी या शासनाच्या नियमाप्रमाणे नगरपालिका प्रशासनातील विविध विभागात कर्मचारी यांची पदे भरणे आवश्यक असतांनाही अद्याप नगरपालिका प्रशासन व शासन कोणतीच कार्यवाही करीत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने विविध कर्मचाऱ्यांची पदे भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) : (१) सन २००८ मध्ये मंजूर आकृतीबंधानुसार सफाई कर्मचाऱ्यांची सर्व पदे भरली आहेत. तथापि, दरम्यानच्या काळात शहराच्या वाढलेल्या लोकसंख्येमुळे स्वच्छतेसाठी आवश्यक अधिक कर्मचाऱ्यांची उणीव, ठेकापद्धतीने कंत्राटी कर्मचारी घेऊन आवश्यकतेनुसार भरली जाते.

(२) आरोग्य विभागातील सर्व पदे भरली आहेत. पाणी पुरवठा विभागात २ पदे, ऊर्जा विभागात २ पदे, बांधकाम विभागात २ पदे व अग्निशमन विभागात ४ पदे आजरोजी रिक्त आहेत.

(३) हे खरे नाही. असा कोणताही प्रस्ताव नगरपालिकेकडून शासनास प्राप्त नाही.

(४) • राज्यात राज्यसंवर्गातील एकूण मंजूर पदांपैकी पदोन्नतीची १००९ पदे व सरळसेवेची २७६३ पदे रिक्त आहेत.

• नगर विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ७ मार्च, २०१७ अन्वये अग्निशमन संवर्ग वगळता उर्वरित पदे भरण्याकरीता मान्यता देण्यात आली आहे.

• त्यानुसार सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी १८८९ पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून दिनांक १८ ते २३ मे, २०१८ च्या दरम्यान पूर्व परिक्षा घेण्यात आली आहे. सदर पदभरतीची कार्यवाही ही माहे नोव्हेंबर, २०१८ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

• पदभरतीअंती नगरपरिषदांमध्ये राज्यसंवर्गीय पदांवर कर्मचाऱ्यांना नियुक्ती देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. तसेच मंगळवेढा नगर परिषदेअंतर्गत संवर्गातील मंजूर रिक्त पदे आवश्यकतेनुसार भरण्यात येतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील दौंड नगरपालिकेंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते नगर मोरी या मुख्य रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(२७) ११२१७६ (१९-०४-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील दौंड नगरपालिकेंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते नगर मोरी या मुख्य रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे व कामात मोठ्या प्रमाणावर आनियमितता केल्या प्रकरणी जिल्हाधिकारी, पुणे यांनी नियुक्त केलेल्या समितीचा चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवालाचे स्वरुप काय आहे तसेच समितीने केलेल्या शिफारसीनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) : (१) यासंदर्भात झालेल्या अनियमितता तपासण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांनी उपविभागीय अधिकारी, दौंड यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त केली होती. सदर समितीचा अहवाल जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे प्राप्त झाला आहे.

(२) व (३) सदर चौकशी अहवालानुसार संबंधीत ठेकेदार मे.कोकरे ब्रदर्स दोषी असल्याचे आढळून आल्याने नगरपरिषद दौंड यांनी दिनांक ३/१/२०१८ रोजीच्या आदेशानुसार काळ्या यादीत समाविष्ट करण्याची कार्यवाही केली आहे. तसेच मुख्याधिकारी व अभियंता हे सकृतदर्शनी दोषी असल्याचे दिसून येत असून त्यांच्याबाबतच्या कार्यवाहीस आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई / शासन सक्षम असल्याने तसा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून नगरपरिषद संचालकांना पाठविण्यात येत आहे.

कोरपना (जि.चंद्रपूर) नगरपंचायत नियमांना डावलून व चुकीच्या पध्दतीने निधी खर्च करीत असल्याबाबत

(२८) ११२७१६ (१९-०४-२०१८). ॲड.संजय धोटे (राजूरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपना नगरपंचायत (जि.चंद्रपूर) येथील पशुसंवर्धन विभागाच्या भूखंडातील कक्ष, कंम्पाऊंड वॉल, तसेच ग्रामसेवक निवास, जूनी ग्रामपंचयात इमारत, समाजमंदिर कायदेशिर प्रक्रीया पूर्ण न करता नियमबाह्य कार्यवाही करून सार्वजनिक मालमत्तेची हानी केली असल्याचे दिनांक २६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नगरपंचायतीने पशुसंवर्धन विभागाच्या भूखंडातून रस्ता केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरपना नगरपंचायतीने ७ सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या विहीरी बुझविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोरपना येथे १ कोटी पेक्षा जास्त निधी खर्च होउनही मंजूर असलेली नळयोजना चुकीच्या पध्दतीने निधी खर्च केल्यामुळे अद्यापही कार्यान्वीत झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कोरपना नगरपंचायत नियमांना डावलून व चुकीच्या पध्दतीने निधी खर्च करीत असल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळुन आले आहे व त्यानुषंगाने मनमानीपणे कारभार करणाऱ्या नगरपंचायतीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) : (१) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी त्यांच्या दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ च्या पत्रान्वये त्यांची अनुमती न घेता पशुवैद्यकीय दवाखान्याचे संरक्षण कुंपण तोडण्याची नियमबाह्य कृती घडल्याचे मुख्याधिकारी, नगरपंचायत कोरपना यांच्या निदर्शनास आणून देऊन त्यांचे स्पष्टीकरण मागविले होते.

(२) हे खरे नाही.

तसेच दिनांक २९ नोव्हेंबर, २०१७ च्या पत्रान्वये मुख्याधिकारी, नगरपंचायत कोरपना यांनी पशुवैद्यकीय दवाखान्याची संरक्षण भिंत पाडण्याचे आदेश त्यांनी दिले नसल्याचे तसेच सदर भिंत पाडतेवेळी नगरपंचायतीचा कोणताही कर्मचारी उपस्थित नसल्याचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना कळविले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

पैकी ६ विहिरी ग्रामपंचायत अस्तित्वात असताना बुजविण्यात आल्या तर १ विहीर कोरडी झाल्याने, तिला संरक्षक कठडे नसल्याने जिवीत हानीची शक्यता लक्षात घेऊन ती बुजविण्याचा निर्णय नगर पंचायतीने घेतला आहे.

(४) मंजूर नळयोजना ही ग्रामपंचायत असताना मंजूर झाली असून जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाकडून सदर योजनेचे ९०% काम पूर्ण झाले आहे. दरम्यान नगरपंचायत अस्तित्वात असल्याने हे काम थांबविण्यात आले होते. नगरपंचायतीने दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजीची विशेष सभेत सदर योजनेचे काम जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना वर्ग करण्याबाबतचा ठराव मंजूर केला होता. तथापि, नगरपंचायत झाल्याने आता जिल्हा परिषदेस निधी उपलब्ध करुन देणे शक्य होणार नसल्यामुळे, झालेले काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास हस्तांतरण करावे, असे ठरविण्यात आले आहे.

(५) या प्रकरणात नियम डावलून व चुकीच्या पद्धतीने निधी खर्च केल्याचे आढळून आले नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्हयातील तळेगाव दाभाडे येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या निवासस्थानाचे भव्य स्मारकात रुपांतर करण्याबाबत

(२९) ११२८१६ (१२-०४-२०१८). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील तळेगाव दाभाडे येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या निवासस्थानाचे भव्य स्मारकात रुपांतर करुन त्याठिकाणी मोठे वाचानालय आणि अभ्यासक व

संशोधकांना ग्रंथालय करण्याची मागणी तळेगावांतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीने शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्मारकाच्या विस्तारासाठी आजुबाजूचे चार वर्षापूर्वी आरक्षित केलेल्या सुमारे २९ गुंठे जागेचे आरक्षण प्रशासनाने रद्द केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार या प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, राज्याचे मा.सामाजिक न्यायमंत्री यांनी या स्मारकास दिलेल्या भेटीच्या वेळी प्रस्तावित भूखंड नगरपालिकेच्या माध्यमातून हस्तांतरीत करुन स्मारकासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल असे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) : (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) प्रारुप विकास योजनामध्ये सिटी सर्व्हे नंबर ७४३, ७४४ इत्यादी, अल्टीनो कॉलनीतील खाजगी मालकीच्या भूखंड क्रमांक २९ ते ३४ वर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक या कारणासाठी आरक्षण क्रमांक ११६ प्रस्तावित होते. तसेच सदर आरक्षणाचे समूचित प्राधिकरण विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती हे होते. सदर आरक्षण मंजूर रेखांकनातील भूखंडावर प्रस्तावित होते. नगरपरिषदेने दिनांक २४ फेब्रुवारी, २०१० रोजी ठराव करुन नगरपरिषद सदर जागा संपादन करणार नसून स्मारक समितीने स्वखर्चाने सदरचे भूखंड घेऊन आरक्षण विकासित करावे असा निर्णय घेतला. अशा परिस्थितीत जर का स्मारक समितीने भूखंड स्वखर्चाने विकत घेऊन तेथे स्मारक विकसित करावयाचे असेल तर त्या कामी स्मारक समिती रहिवास विभागातील भूखंड खाजगीरित्या विकत घेऊ शकते. याबाबींचा विचार करुन शासन स्तरावर सदर आरक्षण विकास योजना मंजूरीवेळी वगळले आहे.

(४) असे लेखी आश्वासन दिल्याचे आढळून येत नाही. तथापि, सामाजिक न्याय विभागाने बंगल्याच्या डागडूजी व सुशोभिकरणासाठी रुपये १ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन दिला आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद शहारासाठी केंद्र शासनाच्या योजनेतून पथदिवे बसविण्यामध्ये झालेला गैरव्यवहार

(३०) ११३९७० (१४-०४-२०१८). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहारासाठी केंद्र शासनाच्या योजनेतून एलईडी पथदिवे बसविण्यासाठी निधी मिळाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एलईडी पथदिवेकरिता दिलेल्या कंत्राटदार कंपनी सोबत करार पत्रकावर मा.आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांची स्वाक्षरी नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा. उच्च न्यायालयाने या निवेदीतील काही अटी व नियम बदलण्यासाठी सांगितले असताना या निविदेत नियम व अटी बदलल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, निविदेचा कार्यादेश व करारनामा झाल्यानंतरसुध्दा अद्यापपर्यंत स्थानिक कंत्राटदारामार्फत कामे करून महानगरपालिकेचा निधी खर्च केला जातो, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधीतांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१८) : (१) औरंगाबाद शहरातील एल.ई.डी.पथदिवे बसविण्यासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झालेला नाही. ही वस्तुस्थिती आहे.
(२) एल.ई.डी.पथदिवे बसविण्यासाठी दिलेल्या कंत्राटदार कंपनीसोबत केलेला सुधारित करार महानगरपालिका आयुक्त यांनी प्राधिकृत केल्यानुसार कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षरीने करण्यात आलेला आहे.
(३) कंत्राटदार कंपनीने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या एसएलपी मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक २०.११.२०१५ च्या आदेशान्वये महानगरपालिकेने दिलेले कार्यादेश जाहिरातीचे अधिकार वगळून कायम केले आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार महानगरपालिकेने एल.ई.डी. पथदिवे बसविण्याचे सुधारित कार्यारंभ आदेश दिनांक १.९.२०१६ रोजी कंत्राटदार कंपनीस दिले आहेत.
(४) औरंगाबाद शहरातील जुन्या पथदिव्यांच्या देखभालीसाठी निविदा काढूनही प्रतिसाद न मिळाल्यामुळे यापूर्वी २२ कामांसाठी नियुक्त कंत्राटदारांना नविन पथदिवे बसवून होईपर्यंत सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार रितसर वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

पवई (मुंबई) येथील उद्यानात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याबाबत

(३१) ११६५६८ (०३-०८-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबइतील पवई येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यानात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याकरिता महानगरपालिकेकडून जमीन हस्तांतरित करण्याकरीता विलंब होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जमीन हस्तांतरित करण्याची प्रक्रिया कधी पूर्ण करण्यात येणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१८) : (१) व (२) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या याचिका (एस.एल.पी.) क्रमांक ८५१९/२०१६ अन्वये, दिनांक १८.०१.२०१३ रोजी अन्य प्रकरणांतील अंतरिम आदेशानुसार, सार्वजनिक ठिकाणी राष्ट्रपुरुषांचे पुतळे उभारण्याबाबत स्थगिती देण्यात आली आहे.

सबब पवई येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान हे सार्वजनिक असल्याने सद्य:स्थितीत त्याठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारणे शक्य नसल्याचे महानगरपालिकेमार्फत पवई तलाव सेवा समिती यांना कळविण्यात आले आहे.

नवी मुंबईत आरोग्यासंदर्भात केलेल्या सर्व्हेक्षणानुसार उन्हाळ्यात पोटाचे विकार झालेल्या रुग्णांमध्ये वाढ झाल्याबाबत

(३२) ११६८२८ (०१-०८-२०१८). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील आरोग्यासंदर्भात केलेल्या सर्व्हेक्षणानुसार उन्हाळ्यात बाहेरील खाद्यपदार्थ खाल्यामुळे पोटाचे विकार झालेल्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याची बाब दिनांक ११ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मार्च ते जूनपर्यंत मूतखडा या आजाराच्या रुग्णांमध्ये ३० ते ५० टक्के वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्सास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०१८) : (१) व (२) • दि. ०१.०१.२०१८ ते ३१.०५.२०१८ या कालावधीत गॅस्ट्रो एंटरायसीसचे ४९ रूग्ण आढळले आहेत.याव्यतीरिक्त नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोणतेही साथीचे आजार उद्भवलेले नाहीत.

• नवी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक रूग्णालयाच्या अहवालानुसार माहे मार्च २०१८ ते जून २०१८ या कालावधीमध्ये मुतखडा आजाराच्या रूग्णांमध्ये वाढ झालेली नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) •नवी मुंबई महानगरपालिका नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील कार्यक्षेत्रातील कर्मचाऱ्यांमार्फत गृहभेटींद्वारे साथरोग आजाराचे सर्वेक्षण करण्यात येते.

• नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व विभाग कार्यालयामार्फत पाणी नमुने गोळा करून अनूजिवीय तपासणीसाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक प्रयोगशाळेत पाठविले जातात.

• संपूर्ण कार्यक्षेत्रातील तपासणीचा अहवाल अयोग्य आल्यास प्रतिबंधात्मक व उपचारात्मक कार्यवाही करण्यात येते.

• नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत साथीच्या आजारापासून बचाव करण्याकरीता तसेच नागरिकांनी जागृत रहावे याकरीता स्थानिक वृत्तपत्रात, हस्तपत्राद्वारे, जाहिरातीद्वारे आरोग्य विषयक शिक्षण देण्यात येत असल्याचे नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहरात प्रतिदिनी निर्माण होणाऱ्या कचऱ्याची हायड्रोलिक ऑरेटेड मेकॅनाइज्ड केंद्रात विल्हेवाट लावण्याबाबत

(३३) ११७१०४ (२७-०७-२०१८). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.आऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात प्रतिदिनी निर्माण होणाऱ्या सुमारे ६५० मेट्रिक टन कचऱ्याची विल्हेवाट महालक्ष्मी येथे हायड्रोलिक ऑपरेटेड मेकॅनाइज्ड केंद्रात लावण्यासाठी सन २००७ मध्ये नेमलेल्या कंत्राटदाराच्या कंत्राटीचा कालावधी दिनांक ८ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास संपुष्टात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी नवीन कंत्राटदाराची निवड करण्यासाठी निविदा प्रक्रिया करुन नवीन कंत्राटदाराची नियुक्ती केली आली आहे काय, असल्यास, केव्हा व कोणत्या कंत्राटदारांची नियुक्ती केली आहे,

(३) असल्यास, कचरा उचलण्यासाठी एकूण किती व कोणकोणत्या कंत्राटदारांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या, प्राप्त निविदापैंकी कमीत कमी दराची व जास्तीत जास्त दराची निविदा कोणाची होती,

(४) असल्यास, पूर्वीच्या कंत्राटदाराच्या मुदतीचा कालावधी दिनांक ८ मे, २०१७ रोजी समाप्त झाला होता हे लक्षात घेता नवीन कंत्राटदार नियुक्त करण्याच्या दरम्यानच्या कालावधी कचरा उचलण्याचे कंत्राट कोणत्या कंपनीला दिले होते व किती रक्कमेकरिता,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी कंत्राटदार व त्यांचा देकार खालीलप्रमाणे आहे:-

कालावधी	कंत्राटदार	देकार (रु.प्रति मे. टन)
२०१७-१८	१) मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेन्ट सेल प्रा.लि.	२८७.००

	२) मे.ध्रुव इनफ्रास्ट्रक्चर	४३६.००
२०१८-१९	१) मे. कवीराज वेस्ट मॅनेजमेन्ट प्रा.लि.	२७८.१०
	२) मे. भवानी ट्रेडर्स	२७९.००

सन २०१७-१८ या कालावधीकरीता मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेन्ट सेल प्रा. लि. यांना व सन २०१८-१९ या कालावधीकरीता मे. कवीराज वेस्ट मॅनेजमेन्ट प्रा. लि. यांना कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे कंत्राट देण्यात आले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

विटावा ते कोपरी खाडीपूल व कळवा नाका ते आत्माराम पाटील चौक (जि.ठाणे) रस्ता रुंदीकरण आणि सेवा रस्त्याच्या प्रकल्पाबाबत

(३४) ११७९४२ (२३-०७-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील कळवा परिसरातील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या विटावा ते कोपरी खाडीपूल व कळवा नाका ते आत्माराम पाटील चौक रस्ता रुंदीकरण आणि सेवा रस्त्याचा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांची भेट घेऊन मागणी केलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे, त्यावर कोणता निर्णय घेतला व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१०-२०१८) : (१) होय.

(२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधींनी ठाणे येथील कळवा परिसरातील विटावा ते कोपरी दरम्यान खाडीपूलाची उभारणी करणे व कळवा ते आत्माराम पाटील चौक दरम्यान रस्ता रुंदीकरण करणे ही कामे आणि सेवा रस्त्याचा प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्याची विनंती केली आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने क्रमांक एमआरडी-३३१८/प्र.क्र.९/नवि-७, दिनांक १९ एप्रिल, २०१८ च्या शासन निर्णयाान्वये ठाणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामधील विटावा ते कोपरी दरम्यान खाडी पुलाची उभारणी करणे व कळवा ते आत्माराम पाटील चौकी दरम्यानचे रस्ता रुंदीकरण व सर्व्हीस रोड हे प्रकल्प ठाणे महानगरपालिकेमार्फत होती घेण्याबाबत ठाणे महानगरपालिकेला निर्देश दिले आहेत.

मुंबई महानगरपालिका रुग्णालयातील डॉक्टरांच्या अपु-या संख्येमुळे १२ उपनगरी रुग्णालयांतील अतिदक्षता विभाग (आयसीयू) खासगी संस्थांना कंत्राटी पध्दतीने देण्याबाबत

(३५) ११८५०८ (२९-०७-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका रुग्णालयातील डॉक्टरांच्या अपु-या संख्येवर उपाययोजना म्हणून १२ उपनगरी रुग्णालयांतील अतिदक्षता विभाग (आयसीयू) खासगी संस्थांना कंत्राटी पध्दतीने देण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत घेण्यात आल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरी रुग्णालयात डॉक्टरांची भरती होण्यासाठी बराच कालावधी लागणार असुन रुग्णालयाला डॉक्टर मिळत नसल्याने खासगीकरण करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले असुन याबाबत शासनाने रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणुन आवश्यक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१८) : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १२ रुग्णालयांमध्ये अतिदक्षता विभागातील फक्त विशेषज्ञ (Intensivists) डॉक्टरांच्या सेवा बाह्यस्त्रोतीकरणाद्वारे उपलब्ध करुन देण्याचा निर्णय महानगरपालिकेमार्फत घेण्यात आला आहे.

(२) व (३) उपनगरीय रुग्णालयांच्या अतिदक्षता विभागातील निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे सोडून जाण्याचे प्रमाण जास्त आहे. रुग्णांना सातत्यपूर्व उच्च दर्जाची सेवा देणे शक्य व्हावे याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बाह्यस्त्रोतीकरणाद्वारे विशेषज्ञ (Intensivists) डॉक्टरांच्या सेवा दोन वर्षाच्या कालावधीकरीता उपलब्ध करुन देण्यासाठी निविदा काढण्यात आली आहे.

सदर कंत्राट कालावधी पूर्ण झाल्यावर अतिदक्षता विभागातील निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे प्रचलित पध्दतीने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत भरण्यात येणार आहेत.

लोणार सरोवरावजळील (जि.बुलढाणा) झोपडपट्टीतील नागरिकांना घरे रिकामी करण्याची दिलेली नोटीस

(३६) ११९२२४ (२८-०७-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार सरोवरावजळील (जि.बुलढाणा) झोपडपट्टीतील नागरिकांना घरे रिकामी करण्यासाठी सात दिवसांच्या आत नोटीस पाठविण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक २० मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास शासनाला दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) नगर परिषदेने मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाच्या आदेशानुसार संबंधीतांना नोटीसा बजावल्या आहेत.

(३) मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचे दिनांक २१ मार्च, २०१८ चे आदेशान्वये सरोवर काठाच्या पूर्वेकडील शासकीय जमिनीवर असलेल्या अतिक्रमित झोपडपट्टी धारकांना आठ दिवसाचे आत IHSDP योजनेअंतर्गत लाभार्थी हिस्सा भरुन घरकुलांमध्ये स्थलांतरीत होण्याबाबत नोटीसा बजावण्यात आल्या व दिनांक १६ एप्रिल, २०१८ रोजी नगर परिषद, महसूल विभाग व पोलीस विभाग यांनी संयुक्तपणे कार्यवाही करुन सदर जागेवरील अतिक्रमण हटविण्यात येऊन जागा पूर्ववत करण्यात आली आहे.

बुलढाणा शहरातील (जि.बुलढाणा) पथदिवे बंद असल्याबाबत

(३७) ११९२५९ (२९-०७-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा शहरातील (जि.बुलढाणा) पथदिवे विद्यूत देयके न भरल्याने व वारंवार बिघाड होत असल्याने बंद असून नागरिकांची गैरसोय होऊन अपघात होण्याच्या संख्येत वाढ झाली असल्याची बाब दिनांक ०५ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक नागरिकांनी याबाबत वारंवार तक्रार करुन तसेच दिनांक ०८ मार्च २०१८ रोजी वा त्या सुमारास नगरपरिषद प्रशासनास निवेदन देऊनसुध्दा स्थानिक अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन संबंधितांविरूध्द कारवाई करुन पथदिवे दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) : (१) व (२) • दिनांक ३१ मार्च, २०१८ अखेर वीज बिलाची थकबाकी न भरल्याने महावितरण कंपनीकडून विद्युत पुरवठा खंडित केल्याने काही काळ पथदिवे बंद होते.

• ऊर्जा विभागाच्या धोरणानुसार थकबाकी भरुन विद्युत पुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे. आजमितीस थकबाकीमुळे पथदिवे बंद आहेत, अशी बाब नाही.

• बंद पडणाऱ्या पथदिव्यांच्या दुरुस्तीचे काम करण्याची प्रक्रिया सातत्याने नगरपरिषदेकडून करण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

आर्णी नगरपरिषदेस (जि.यवतमाळ) अग्निशमक वाहन उपलब्ध करून देण्याबाबत

(३८) ११९५०३ (२३-०७-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी नगरपरिषदेस (जि.यवतमाळ) अग्निशमक वाहन उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी मा.नगरविकास राज्यमंत्री यांनी दि.२२.५.२०१८ रोजी निवेदन देऊन विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, सदरहू निर्णयानुसार ननगरपरिषद आर्णीला अग्निशमक वाहन उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) : (१) होय.

(२) महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत आर्णी नगरपरिषेदचा प्रकल्प अहवाल नगरपरिषदेकडून संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, मुंबई यांना दिनांक १६ मे, २०१८ रोजी मान्यतेस्तव पाठविण्यात आला आहे. यात अग्निशमन वाहन खरेदीचाही समावेश आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागामधील कर्मचाऱ्यांना गत ९ महिन्यांचे वेतन मिळाले नसल्याबाबत

(३९) ११९६६४ (२९-०७-२०१८). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागातील कर्मचाऱ्यांना गत ९ महिन्यांचे वेतन न मिळाल्यामुळे परिवहन विभागातील तांत्रिक, अतांत्रिक व प्रशासकीय स्वरुपाची कामे करणारे कर्मचारी गत २८ दिवसांपासून संपावर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार कर्मचाऱ्यांना गत नऊ महिन्यांपासून वेतन न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, परिवहन विभागाचे खाजगीकरण करण्याचा प्रस्तावावर सोलापूर महानगरपालिका विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) : (१) सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागातील कर्मचारी दिनांक ९ एप्रिल, २०१८ ते १३ मे, २०१८ पर्यंत एकूण ३५ दिवस संपावर गेले होते, हे खरे आहे.
(२) सोलापूर परिवहन उपक्रम हा सध्या तोट्यात चालला असल्याने उपक्रमाला कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन व निवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन विषयक लाभ वेळेवर प्रदान करणे शक्य होत नाही.
• यासाठी आवश्यक निधी सोलापूर महानगरपालिकेलाच उपलब्ध करुन द्यावा लागत आहे. सोलापूर, महानगरपालिकेची आर्थिक स्थिती ही कमकुवत असल्याने परिवहन उपक्रमास वेळच्यावेळी यासाठी निधी उपलब्ध करुन देणे शक्य होऊ शकलेले नाही.
• सेवेत कार्यरत कर्मचाऱ्यांचे ऑक्टोबर, २०१७ ते जून, २०१८ पर्यंतचे वेतन प्रदान होणे बाकी आहे. कर्मचाऱ्यांना जुलै व ऑगस्ट, २०१८ चे वेतन अदा केले आहे. माहे सप्टेंबर, २०१८ चे वेतन अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
• दरम्यान थकीत वेतनाच्या संदर्भात कर्मचाऱ्यांनी मा.न्यायालयात दावा दाखल केला असून सध्यस्थितीत प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.
(३) असा कोणताही प्रस्ताव सध्या विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मेहकर (जि.बुलढाणा) नगरपालिकेच्या हद्दवाढीबाबत

(४०) ११९७११ (२६-०७-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेहकर (जि.बुलढाणा) नगरपालिकेच्या हद्दवाढीसाठी शासनाने जिल्हाधिकारी बुलढाणा यांना दिनांक २२ मार्च, २०१८ ची अंतिम मुदत दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगरपालिकेच्या हद्दवाढीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे काय व त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) : (१) • मेहकर (जि.बुलढाणा) नगरपरिषदेच्या हद्दवाढीची प्राथमिक उद्घोषणा दिनांक २३ जुलै, २००९ च्या राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती. तथापि, अंतिम उद्घोषणा प्रसिद्ध करण्यात आली नाही.

• प्राथमिक उद्घोषणा प्रसिद्ध झाल्यापासून ५ वर्षाच्या कालावधीत अंतिम उद्घोषणा प्रसिद्ध होणे आवश्यक असते. तशी कार्यवाही, या प्रकरणी न झाल्याने आता नव्याने प्राथमिक उद्घोषणा प्रसिद्ध करावी लागेल.
• त्यासाठी आवश्यक माहिती दिनांक १५ मार्च, २०१८ च्या शासन पत्रान्वये जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडून मागविण्यात आली होती. ही माहिती दिनांक २२ मार्च, २०१८ पर्यंत पाठविण्यास त्यांना सांगण्यात आले होते.
(२) व (३) • जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे दिनांक २५ जुलै, २०१८ च्या पत्रान्वये आवश्यक माहिती प्राप्त झाली असून ती तपासण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील मानखुर्द येथे महानगरपालिकेच्या जलवाहिन्यांमधून होत असलेली पाणी चोरी

(४१) ११९८२० (२९-०७-२०१८). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मानखुर्द येथे महानगरपालिकेच्या जलवाहिन्यांना पाईप जोडून पाण्याची सर्रासपणे चोरी होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत महानगरपालिकेकडे तक्रार करुनही कोणतीच कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१८) : (१) अनधिकृत जलजोडणीबाबतच्या तक्रारी बृहन्मुंबई महानगरपालिकेस वारंवार प्राप्त होत असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(२) व (३) सन २०१७-१८ या कालावधीत महानगरपालिकेमार्फत एम/पूर्व विभागातील एकूण ४७० अनधिकृत जलजोडण्या, तसेच दिनांक १ एप्रिल, २०१८ ते ५ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत एकूण १९८ अनधिकृत जलजोडण्या खंडीत करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेने काळ्या यादीत टाकलेल्या कंत्राटदाराशी संबंधित असलेल्या कंपनीला कचरा वाहतुकीचे कंत्राट दिल्याबाबत

(४२) ११९९०८ (२९-०७-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नालेसफाईच्या कामातील गैर कृत्यांबद्दल मुंबई महानगरपालिकेने काळया यादीत टाकलेल्या कंत्राटदाराशी संबंधित कंपनीला कचरा वाहतुकीचे कंत्राट देण्याच्या प्रशासनाच्या प्रस्तावाला स्थायी समितीने पाठिंबा दिल्याचे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काळया यादीत टाकलेल्या कंत्राटदाराशी संबंधित असलेल्या कंपनीला कचरा वाहतुकीचे कंत्राट देण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१८) : (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने स्थायी समितीच्या मंजुरीने माहे मे, २०१८ मध्ये लघुत्तम प्रतिसादात्मक निविदाकार मे. कविराज एमबीबी वेस्टमॅनेजमेंट प्रा.लि. यांना कचरा वाहतुकीचे कंत्राट दिले असून, सदर निविदाकाराचा नालेसफाईच्या कामातील गैर कृत्याबद्दल महानगरपालिकेने काळया यादीत टाकलेल्या कंत्राटदाराशी संबंध नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्हयातील कर्जत ते नेरळ डोणेगावापर्यंतच्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(४३) १२०७९१ (२६-०७-२०१८). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयातील कर्जत ते नेरळ डोणेगावापर्यंतच्या २१ किलोमीटर रस्त्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने गत वर्षी केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने पहिल्याच पावसात या रस्त्यात मोठे-मोठे खड्डे पडून वारंवार अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या निकृष्ट रस्त्याच्या कामाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१८) : (१) कर्जत ते डोणे या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत दिनांक ३१ मे, २०१४ रोजी पूर्ण करण्यात आले आहे.
(२) निविदेनुसार डांबरी रस्त्याकरीता ठेकेदाराचा दोन वर्षांचा दोषदायीत्व कालावधी दिनांक ३१ मे, २०१६ रोजी संपल्यानंतर सदर रस्ता काही प्रमाणात क्षतीग्रस्त झाला आहे.
(३) व (४) सदर रस्त्याच्या कामाची माहे जानेवारी, २०१८ मध्ये व्हि. जे. टी. आय. या संस्थेमार्फत चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीत पुढील नोंदीचा समावेश आहे :-
अ) दैनंदिन व नियतकालिक देखभाल दुरुस्ती न झाल्याने रस्ता क्षतीग्रस्त झाला आहे.

आ) रस्त्याच्या क्षेत्रात ३००-३५० से.मी. इतके अतिपर्जन्यमान असल्याने रस्ता अत्यंत खडतर पर्यावरण क्षेत्रात आहे.

इ) पावसाचे पाणी वाहून जाण्याकरीता सुयोग्य व्यवस्था असणे आवश्यक आहे व त्याची नियमित देखरेख आवश्यक आहे,

ई) वापरण्यात आलेल्या साहित्यांच्या चाचण्या व त्यांचे निकर्ष

सदर चौकशीत आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने प्राधिकरणाने दि. ९ एप्रिल, २०१८ रोजी पाठविलेल्या नोटीशीला ठेकेदाराने दिनांक २७ एप्रिल, २०१८ रोजी खुलासा सादर केला आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

इचलकरंजी (जि.कोल्हापूर) शहरातील जलशुध्दीकरण केंद्रातून रॉ वाटरच्या नावाखाली दररोज लाखो लिटर पाणी वाहून जात असल्याबाबत

(४४) १२१२३३ (२९-०७-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) शहरातील शिवाजी पुतळयानजीक असलेल्या जलशुध्दीकरण केंद्रातून रॉ वाटरच्या नावाखाली दररोज लाखो लिटर पाणी गटारातून वाहून जात असल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी व पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार यास जबाबदार असणा-यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) : (१) • इचलकरंजी शहराकरीता असणाऱ्या जलशुद्धीकरण केंद्राचे दैनंदिन प्रचालन करताना फिल्टर बेड नियमितपणे पाण्याने साफ करावे लागतात. याकरीता साधारणत: १० लाख लिटर पाणी वापरले जाते. फिल्टर बेड धुतल्यानंतर हे पाणी काही अंशी वापरले जाते व उर्वरित पाणी करोडपती कॉलनी मधून भूमिगत पाईपद्वारे भाजी मार्केटजवळ असणाऱ्या सारण गटारीत सोडले जाते, हे खरे आहे.

• जलशुद्धीकरण केंद्र बांधल्यापासून फिल्टर बेड धुतलेले पाणी पुनर्वापर यंत्रणेची व्यवस्था नसल्याने हे पाणी गटारीमध्ये सोडणे अनिर्वाय आहे.

(२) • वाया जाणाऱ्या पाण्याचा पुनर्वापर करण्याच्या दृष्टीने जलशुद्धीकरण केंद्र आवारात रिसर्क्युलेशन टॅक व पंप हाऊस बांधणे व त्याची दाबनलिका नविन बांधलेल्या एरिएशन फाऊटन पर्यंत जोडणे इत्यादी कामांकरीता राज्यस्तरीय नगरोत्थान योजनेअंतर्गत रुपये १.४३ कोटीच्या किंमतीस दिनांक २९/११/२०१६ च्या शासन निर्णयान्वये सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

• सदरचे काम हे पूर्ण ठेव तत्वावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येणार असून त्याबाबतचा मे.कौन्सिल ठराव ४१, दिनांक २९/४/२०१७ अन्वये मान्यता दिली आहे. याकामी नगरपरिषदेने ३१ डिसेंबर, २०१७ रोजी रुपये १.४३ कोटी वर्ग केले आहेत.

• तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून निविदा प्रक्रिया सुरु केली आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण होताच प्रत्यक्ष कामास सुरुवात होऊन काम पूर्ण होताच वाया जाणारे पाणी अडविले जाऊन पाण्याचा पुनर्वापर होणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या बहुतांश शाळांमध्ये आठवीचा वर्ग नसल्याबाबत

(४५) १२१४३९ (२९-०७-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या बहुतांश शाळांमध्ये आठवीचा वर्ग नसल्याने सुमारे एक लाख विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्याचे माहिती अधिकारामध्ये देण्यात आलेल्या माहितीतून माहे एप्रिल, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक विद्यार्थ्याला आठवी पर्यंत मोफत शिक्षण अनिवार्य असतानाही महानगरपालिकेच्या हजारो शाळांना आठवीचे वर्ग नसल्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१८) : (१) व (२) • शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १ ली ते ७ वी पर्यंतच्या ३६३ शाळा होत्या, त्यापैकी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये १०३ शाळांमध्ये ८ वी चे वर्ग नव्याने सुरु करण्यात आले असून, उर्वरित २६० शाळांमध्ये ८ वी चे नवीन वर्ग सुरु करण्याची आवश्यकता नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

• शैक्षणिक वर्ष २०१४-१५ ते २०१८-१९ या कालावधीत महानगरपालिकेच्या ४९६ शाळांमध्ये ८ वी चे नवीन वर्ग उघडण्यात आले आहेत.

त्यामुळे ८ वी चा वर्ग नसल्याने विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्याची बाब खरी नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

• महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २०११ अन्वये महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सन २०१४-१५ पासून सुरु करण्यात आलेल्या ८ वी च्या वर्गांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

शैक्षणिक वर्ष	शाळांची संख्या	नवीन वर्ग संख्या
२०१४-१५	१००	१००
२०१५-१६	११६	१५२
२०१६-१७	१५३	१५३
२०१७-१८	२४	२४
२०१८-१९	१०३	१०३
एकूण	४९६	५३२

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

कूही (जि.नागपूर) येथे घनकचरा व्यवस्थापनअंतर्गत करण्यात येत असलेली कामे नियमानुसार होत नसल्याबाबत

(४६) १२२१३१ (२९-०७-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कूही (जि.नागपूर) नगरपंचायतीमधील घनकचरा व्यवस्थापनअंतर्गत करण्यात येत असलेली कामे नियमानुसार होत नसल्याने त्यावर कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर यांना दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास कूही विकास मंच यांनी लेखी पत्र दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) : (१) होय, हे खरे आहे. त्यानंतरही कुही विकास मंचाच्या सचिवांच्या याबाबतच्या तक्रारी “आपले सरकार” या पोर्टलवर प्राप्त झाल्या आहेत.

(२) • नगरपंचायत कुही घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा संकलन व प्रक्रियेबाबत कुही विकास मंचाने दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी व त्यानंतर सदर मंचाचे सचिव श्री. उमाजी पुनवटकर, यांनी “आपले सरकार” या पोर्टलवर दिनांक २१ मार्च, २०१८ रोजी तक्रार दाखल केली होती. याबाबत तक्रारदारास वस्तुस्थिती अवगत करण्यात आली आहे.

• दरम्यान त्यांनी पुन्हा “आपले सरकार” या पोर्टलवर दिनांक ५ एप्रिल, २०१८ रोजी तक्रार दाखल केली असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशी करण्यासाठी उप जिल्हाधिकारी (भूसंपादन पी.पी.१) तथा प्रभारी अधिकारी, नगरपालिका प्रशासन शाखा व जिल्हा प्रशासन अधिकारी, नागपूर यांची चौकशी समिती जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दिनांक २७ एप्रिल, २०१८ रोजी नेमली आहे. या समितीने प्राथमिक चौकशी पूर्ण करुन अहवाल सादर केल्यावर त्यातील निष्कर्षानुसार जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडून पुढील योग्य ती कार्यवाही होईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्य शासनाच्या छोट्या प्लॉटधारकांना दिलासा देण्यासाठी रिस्क बेस परवानगी धोरणात बदल करण्याची केलेली मागणी

(४७) १२२९८३ (२५-०७-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इज़ ऑफ डुइंगबिझनेस अंतर्गत शासनाने सुमारे सव्वादोन गुंठ्यांपर्यंत वास्तुविशारद अथवा परवानाधारक इंजिनियर यांच्या स्तरावरच परवानगी देण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेकडून आतापर्यंत तीनच बांधकामांना परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेतील बांधकाम खात्याच्या दुर्लक्षामुळेच या निर्णयाची अंमलबजावणी होऊ शकत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाच्या छोट्या प्लॉटधारकांना दिलासा देण्यासाठी रिस्क बेस परवानगी धोरणात काही बदल करण्याची आवश्यकता असल्याबाबत वास्तुविशारद व जागामालक यांनी वारंवार बांधकाम विभाग व शासनास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, रिस्क बेस धोरणामध्ये परवानगी देणेबाबत शासन काही बदल करणार आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०१८) : (१) शासन निर्णय क्र.टिपीबी ४३१७/१०९/प्र.क्र. ११/२०१७/सूचना/नवि-११ दि. २२/८/२०१७ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये २०० चौ.मी. पर्यतच्या भूखंडावरील बांधकाम परवानगी वास्तुविशारद अथवा परवाना धारक इजिंनिअर यांचे स्तरावर देणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.
(२) व (३) या प्रणाली अंतर्गत अद्यापपर्यंत आर्किटेक्ट अथवा ला. इंजिनिअर यांच्यामार्फत पुणे महानगरपालिकेकडे प्रस्ताव दाखल झालेले नसलेने पुढील कार्यवाही झालेली नाही.
(४) शासन निर्देशित रिस्क बेस प्रणाली व्यतिरिक्त नविन जोखिम आधारित इमारत परवानगीच्या धर्तीवर ला.इंजिनिअर/ आर्कीटेक्ट यांच्या स्वयं घोषणापत्रानुसार ट्रस्ट अॅण्ड व्हेरिफाय या धोरणावर बांधकाम परवानगी देण्याचा निर्णय पुणे महानगरपालिकेने जानेवारी २०१८ मध्ये घेतला आहे. यामध्ये स्वयंघोषणेच्या नमुन्यामध्ये बदल करण्याची मागणी आर्किटेक्ट व ला. इंजिनिअर व सर्व्हेअर यांची संघटना AESA यांनी केली आहे.
(५) आर्किटेक्ट व ला. इंजिनिअर यांच्या स्वयंघोषणा हमीपत्राच्या नमुन्यामध्ये बदल माहे जुलै २०१८ मध्ये करुन संबंधितांना महानगरपालिकेकडून कळविण्यात आलेले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

मलकापूर (ता.कराड, जि.सातारा) येथील नगरपंचायतीस "क" वर्ग नगरपरिषदेचा दर्जा देणेबाबत

(४८) १२३७१७ (२५-०७-२०१८). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (ता.कराड, जि.सातारा) येथील नगरपंचायतीस लोकसंख्येच्या निकषानुसार माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरमयान 'क' वर्ग नगरपरिषदेप्रमाणे आकृतीबंद निश्चित करून देखील सदर नगरपंचायतीला 'क' वर्ग नगरपरिषदेचा दर्जा देण्यास शासनाकडून विलंब होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपंचायतीने यासंदर्भात शासनाकडे वेळोवेळी प्रस्ताव पाठवून पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मलकापूर नगरपंचायतीस 'क' वर्ग नगरपरिषदेचा दर्जा मिळावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मलकापूर नगरपंचायतीस 'क' वर्ग नगरपरिषदेचा दर्जा बहाल न करण्याची सर्वसाधारण करणे काय आहेत,

(५) असल्यास, मलकापूर नगरपंचायतीस 'क' वर्ग नगरपरिषदेचा दर्जा तातडीने देण्यात यावा यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) : (१) सदर बाब शासनाच्या विचाराधीन होती.

(२) होय.

(३) होय.

(४) • महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगर अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा.४०) च्या अधिनियमातील तरतुदीनुसार कलम ३४१ (ड) आणि कलम ३ च्या पोट-कलम (२), (२अ), (३) मधील तरतूदीनुसार, शासन उद्घोषणा, नगर विकास विभाग क्रमांक एमयूएन-२०१८/प्र.क्र.१३१/ नवि-१८, दिनांक २७ जुलै, २०१८ याद्वारे महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये प्राथमिक उद्घोषणा प्रसिद्ध करुन महाराष्ट्र शासनाने सातारा जिल्ह्यातील मलकापूर नगरपंचायतीस नगरपरिषदेचा दर्जा देण्याबाबत दिनांक २४ सप्टेंबर, २०१८ रोजी अंतिम अधिसूचना निर्गमित केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दौंड नगरपालिका हद्दीतील अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

(४९) १२३९७६ (२६-०७-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड तालुक्यातील (जि.पुणे) अनेक गावांचा समावेश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये (PMRDA) करण्यात आला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, दौंड नगरपालिका हद्दीतील अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे या ठिकाणी रस्ते दुरुस्तीसाठी विशेष रस्ते अनुदान रक्कम रु. १० कोटी मिळण्याची मागणी मा. लोकप्रतीनिधिंनी दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अनुदान देणेबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०१८) :
(१) होय. दौंड तालुक्यातील ५१ गावांचा समावेश प्राधिकरण क्षेत्रामध्ये करण्यात आला आहे.
(२) होय.
(३) शासन धोरणानुसार निधी वितरणाबाबत उचित कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहरात सुमारे १४ हजार २८६ उपकरप्राप्त इमारती मोडकळीस आल्याबाबत

(५०) १२५१०० (२३-०७-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरात सुमारे १४ हजार २८६ उपकरप्राप्त इमारती असून यातील जवळपास सर्वच इमारती जुन्या व मोडकळीस आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वर्षी म्हाडाच्या दुरुस्ती आणि पुर्नरचना मंडळामार्फत या इमारतीचे सर्व्हेक्षण करुन पावसाळ्यापूर्वी इमारतींची यादी जाहीर केली आहे,
(३) असल्यास, एकूण किती इमारती अतिधोकादायक आढळून आल्या व त्यात किती रहिवाशी रहात आहेत व त्यापैकी किती रहिवाशांच्या राहण्याची पर्यायी व्यवस्था केली आहे व अद्याप किती रहिवाशांची पर्यायी व्यवस्था करणे बाकी आहे,
(४) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. प्रकाश महेता (२३-१०-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) व (४) मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत सन २०१८ च्या पावसाळापूर्व सर्वेक्षणात ७ उपकरप्राप्त इमारती अतिधोकादायक असल्याचे आढळून आलेल्या आहेत.

सदर सात धोकादायक इमारतीमध्ये २१४ (निवासी) + १८९ (अनिवासी) = असे एकुण ४०३ भाडेकरू / रहिवाशी आहेत. या इमारतींपैकी १ इमारतीस पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. १११ भाडेकरू / रहिवाशांनी त्यांची इतरत्र पर्यायी व्यवस्था स्वत:च केली आहे. आतापर्यंत २ भाडेकरू / रहिवाशी यांना संक्रमण शिबीरात स्थलांतरीत करण्यात आले आहे. तसेच उर्वरीत अतिधोकादायक इमारतीमधील भाडेकरू/ रहिवाशी यांना आवश्यकतेनुसार मंडळातर्फे जागा खाली करण्याच्या नोटीसा देण्यात येतील व त्यांची पर्यायी व्यवस्था संक्रमण शिबिरात करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

या इमारतींच्या धोकादायक भागांना टेकु लावणे, धोकादायक भाग पाडणे, इ. कार्यवाही करण्यात येत असुन आवश्यकतेनुसार इमारतींच्या दुरूस्तीची कार्यवाही सुरू आहे.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.